पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी १८
शिक्षण विभाग प्राथमिक,

## <u>शुध्दीपत्रक</u>

**जाहिरात क्रं.३२** **दिनांक. ०७/१२/२०१८**

२/-पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण विभागाच्या प्राथमिक शाळांमध्ये सहा महिने कालावधीसाठी मानधन तत्वावर शिक्षक निवडीबाबत २/१२/२०१८ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमधील अटी व शर्ती अनुक्रंमाक १ मध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती समजणेत यावी.

४) वयोमर्यादा जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांका रोजी सर्व साधारण प्रवर्गातील उमेदवारासाठी १८ ते ३८ वर्ष व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांसाठी १८ ते ४३ वर्षापर्यंत राहील.

४) या कार्यालयाकडे समक्ष अर्ज सादर करण्याची मुदत दिनांक.१४/१२/२०१८ अखेर राहील.

सही/-
प्रशासन अधिकारी
शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८

सही/-
**अतिरिक्त आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८

# जाहिरात
## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, शिक्षण विभाग प्राथमिक, पिंपरी पुणे १८
## ०६ महिने मुदतीसाठी एकत्रित मानधन तत्वावर शिक्षक नेमणुकीबाबत.

---

जाहिरात क्रमांक : १०                                        दिनांक : /११/२०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण विभाग प्राथमिक संचलित सर्व माध्यमाच्या प्राथमिक शाळेसाठी तात्पुरते स्वरुपात एकवट मानधन तत्वावर रक्कम रुपये १०,०००/- दरमहा करार पद्धतीने ६ महिने मुदतीसाठी **१०५ एकत्रित मानधन तत्वावर शिक्षक** निवड करणेत येणार आहे. उमेदवारांनी विहित नमुन्यात वैयक्तिक माहितीचा अर्ज प्रमाणपत्रांच्या आणि गुणपत्रकांच्या साक्षांकित प्रती जोडून शिक्षण विभाग पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी १८. येथे सकाळी ११.०० ते दु.२.०० या वेळेत हस्तपोच स्वीकारण्यात येतील.

.

**एकूण : १०५ मानधन तत्वावर शिक्षक**

**सदर जाहिरातीचे अर्ज सादर करण्याबाबत अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.**

१) जाहिरात प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून ७ दिवसापर्यंत आलेल्या पूर्ण अर्जाचा विचार केला जाईल.
२) मुदती नंतर व अपूर्ण अर्जाचा विचार केला जाणार नाही. सदरचे अर्ज दफ्तरी दाखल करण्यात येतील.
३) यासंदर्भात कोणत्याही प्रकारचा पत्र व्यवहार केला जाणार नाही.
४) तसेच पोस्टाने आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.अथवा त्याचा विचार केला जाणार नाही.
५) वरील नमूद वेळेव्यतिरिक्त कोणतेही अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

**शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता –प्राधान्य क्रम**

१) डी.एड इंग्रजी माध्यमातून उत्तीर्ण झालेले उमेदवार.
२) १ ली ते पदवीधर संपूर्ण शिक्षण इंग्रजी माध्यमातून अनिवार्य.
३) इयत्ता १ली ते १२वी संपूर्ण शिक्षण इंग्रजी माध्यमातून झालेले उमेदवार.
४अ) वर नमूद सर्व उमेदवरांना इंग्रजी/मराठी माध्यमातून टी.ई.टी.व अभियोग्यता चाचणी उत्तीर्ण.
४ब) टी.ई.टी उमेदवार उपलब्ध न झाल्यास वरील १ ते ४ च्या प्राधान्य क्रमानुसार उमेदवारांची निवड करणेत येईल.
५) अटी व शर्ती शिथिल करणेचा अधिकार मा.महानगरपालिका आयुक्त यांना राहील.

**एकूण पदे -१०५ मानधन तत्वावर शिक्षक**

| प्रवर्ग | अजा | अज | वि.जा.अ | भ.ज.ब | भ.ज.क | भ.ज.ड | वि.मा.प्र | इ .मा.व | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनुशेष | १३ | ७ | ३ | २.५ | ३.५ | २ | २ | १९ | ४८ | १०० |
| एकूण जागा | १४ | ७ | ३ | ३ | ४ | २ | २ | २० | ५० | १०५ |

**गुणदान तक्ता**

| तपशील | १० वी (गुण) | १२(गुण) | डी.एड (गुण) | टी.ई.टी(गुण) | अभीयोग्यता चाचणी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| भारांश | १० | १० | १० | १० | १० | ५० |

उपरोक्त आरक्षणात पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास प्राप्त व पात्र उमेदवारानुसार जागांमध्ये बदल करणेचे अधिकार मा.महानगरपालिका आयुक्त यांना राहतील.

**अटी व शर्ती :**

१) वयोमर्यादा जाहिरात प्रसिद्धीच्या दिनांकारोजी सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवारासाठी १८ ते ३३ वर्ष व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारासाठी १८ ते ३८ वर्षा पर्यंत राहील.
२) आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता नमूद केले प्रमाणे असणे आवश्यक आहे.गुणवत्ता धारक अर्ज दाराचा प्राधान्याने विचार करण्यात येईल. अर्ज करताना उमेदवाराने जन्म तारखेचा पुराव्यासाठी जन्म तारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याचे दाखल्याचे अथवा शालांत परीक्षेचा उत्तीर्ण प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.(मूळ कागदपत्र तपासणीसाठी उपलब्ध असणे बंधनकारक आहेत.)
३) अर्जा सोबत उमेदवारांनी शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता, जातीचा दाखला, जात पडताळणी प्रमाणपत्र इत्यादी संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित सत्यप्रती जोडण्यात याव्यात.सत्यप्रती जोडले नसल्यास अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.
४) महिला विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

५) सदरचे पद तात्पुरते सहा महिने करार पद्धतीचे आहे या पदावर उमेदवारास शिक्षण विभाग प्राथमिक पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेत राहण्याचा अधिकार मागता येणार नाही.
६) शासकीय व अन्य कारणास्तव मानधन हंगामी भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस, कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे व प्रक्रियेत बदल करणेचे अधिकार मा.महानगरपालिका आयुक्त यांना राहतील.
७) अर्जदाराने आपले अर्ज शिक्षण विभाग,प्राथमिक पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अर्जाप्रमाणे करणे बंधनकारक राहील.
८) अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही.
९) निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार अर्हताधारक नसल्याचे आढळून आल्यास व उमेदवार गैरवर्तन/दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी आपोआप रद्द होईल तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता नियुक्ती रद्द करणेत येईल.
१०) उमेदवारांनी मोबाईल क्रमांक/ई मेल आयडी देणे अनिवार्य आहे.
११) वेळेअभावी पत्र व सूचना पाठविणे कामी मोबाईल एसएमएस वापर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे १८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
शिक्षण विभाग प्राथमिक
क्र.शिक्षण/आस्था/१/कावि/९३०/२०१८
दिनांक : २९ /११/२०१८

**सही/-**
**प्रशासन अधिकारी**
शिक्षण विभाग प्राथमिक
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे १८

अर्जाचा नमुना

| अर्जदाराचा अलीकडे काढलेला आयकार्ड आकाराचा फोटो स्वयंसाक्षांकीत |
|---|

प्रति,
मा.शिक्षण अधिकारी,
शिक्षण विभाग (प्राथमिक),
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११०१८

यांचेकडे सविनय सदर

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभाग प्राथमिक शाळांमध्ये सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाकरिता सहा महिने कालावधीसाठी एकत्रित मानधनावर दरमहा र.रू.१०,०००/- या करार पध्दतीने १०५ शिक्षक पदासाठी अर्ज

महोदय,

१. अर्जदाराचे नाव :मराठी :
इंग्रजी : (कॅपिटलमध्ये) :
२. कायमचा राहण्याचा पत्ता:
३. दूरध्वनी /मोबाईल नंबर : ----------------------------(अनिवार्य)
४. ई. मेल आयडी :-------------------------------------(अनिवार्य)
५. जात :-------------प्रवर्ग :------------------- (अनिवार्य)
६. जन्मतारीख :DD/MM/YYYY संपूर्ण
७. वय (दिनांक ३०/११/२०१८ रोजी ) वर्ष .....महिने.....

| अनु.क्र. | शैक्षणिक/व्यवसायिक पात्रता | माध्यम | बोर्ड/राज्य | उत्तीर्ण दिनांक | किती पैकी | प्राप्त गुण | शेकडा गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी. | | | | | | |
| २ | एच.एस.सी. | | | | | | |
| ३ | डीएड/डीटीएड. | | | | | | |
| ४ | टीईटी | | | | | | |
| ५ | अभियोग्यता चाचणी | | | | | | |
| ६ | इतर पदवी ,पदविका | | | | | | |

अर्जासोबत माझ्या शैक्षणिक व व्यवसायिक पात्रता गुणपत्रके व इतर प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रति जोडलेल्या आहेत.माझी सर्व माहिती सत्य व अचूक आहे.नियुक्तीसाठी जाहिरातीमधील विहित अटीव शर्ती मला मान्य आहेत.तरी माझ्या एकत्रित मानधनावर करार पद्धतीने सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षासाठी ६ महिने कालावधीसाठी हंगामी शिक्षक या पदासाठी निवड होणेस विनंती आहे.

आपला/आपली विश्वासू
अर्जदाराची सही
(अर्जदाराचे संपूर्ण नाव )